म.र.ता

महाराष्ट्र शासन

विभागीय प्रशिक्षण संस्था

मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर(उ), पैठण, जि. औरंगाबाद

दुरध्वनी क्रं.-०२४३१-२३२२३५, २३२४७६, www.madta.in,e-mail id:prabhodini३१paithan@gmail.com

जा.क्र.मप्रांवप्रप्र/उजळणी प्रशिक्षण/नामनि/२०१९-२०/239 दिनांक: ३०/०७/२०१९

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. औरंगाबाद
आवक क्र. 6060
दिनांक 31 JUL 2019

प्रति,

मा.सक्षम अधिकारी,

सर्व कार्यालय/ विभाग ,औरंगाबाद विभाग

विषय: राज्य प्रशिक्षण धोरण-२०११ अंतर्गत गट-क संवर्गातील कर्मचाऱ्याकरिता उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे बाबत.

संदर्भ:- १.शासननिर्णयक्र.टिआरएन-२००९/प्र.क्र.३९/०९/१२-अ,दि.२३ सप्टेबंर,२०११

२. शासन परिपत्रकक्रं : टीआरएन-२०१४/३४२/प्र.क्र.५०/१४/१२-अ. दि.२७ मे २०१४

३. शासननिर्णयक्र.टिआरएन-प्र.क्र.६०/१५/१२-अ. दि.२४ जुन.२०१५

मा. महोदय / महोदया,

संदर्भिय शासननिर्णय दि.२३.०९.२०११ नुसार शासकीय सेवेतील गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांकरिता सन २०१९-२० मध्ये नियोजित प्रशिक्षण सत्रातील माहे ऑगस्ट २०१९ मध्ये दि ०५/०८/२०१९ ते ०९/०८/२०१९ दरम्यान **उजळणी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. तरि आपल्या अधिनस्त कर्मचारी यांना खालील अटी व शर्ती यांची पुर्तता होत असल्यास सदरील प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त करण्यात यावे, हि विनंती.**

अटी व शर्ती

१. प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांचे शासकीय सेवेमधील किमान ७ वर्ष पुर्ण झालेले असणे आवश्यक आहे.
२. प्रशिक्षणार्थी कर्मचारी यांनी उपरोक्त नियोजित प्रशिक्षणास रुजू होण्यापूर्वी मागील ७ वर्षेमध्ये कोणतेही प्रशासकीय प्रशिक्षण घेतलेले नसावे.
३. प्रशिक्षणार्थी कर्मचारी यांनी यापूर्वी उजळणी प्रशिक्षण घेतलेले असल्यास नामनिर्देशन करण्यात येवू नये.
४. ज्या कर्मचारी यांची सेवानिवृत्तीचा कालावधी ३ वर्ष शिल्लक असेल त्यांचे नामनिर्देशन करण्यात येवू नये.
५. प्रशिक्षणार्थी कर्मचारी यांनी कार्यमुक्ती आदेशाची मुळ प्रत व शासकीय ओळखपत्र स्वत: जवळ बाळगणे आवश्यक आहे.
६. प्रशिक्षण कार्यक्रमाचे पहिले सत्र सुरु होण्याच्या एकदिवसा अगोदर किंवा प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी स.०८.००वा. पर्यंत प्रबोधिनी येथे हजर होणे आवश्यक आहे. प्रशिक्षण सत्र सुरू झाल्यानंतर प्रशिक्षणार्थीस कोणत्याही सबबीवर रुजू करून घेतले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

३०/७/१९

३१/७/१९

उपरोक्त संदर्भ ३ अन्वये विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांचेवर उपरोक्त परिच्छेदामध्ये नमुद पात्र कर्मचाऱ्यांचे नामनिर्देशन करुन प्रशिक्षणास पाठविण्याची जबाबदारी सोपविलेली आहे.

सदरचे निवासी प्रशिक्षण राज्य प्रशिक्षण धोरणानुसार देण्यात येत असून उपस्थिती अनिवार्य आहे. प्रशिक्षणास नामनिर्देशित कर्मचारी गैरहजर राहिल्यास प्रशिक्षणाचा खर्च संबंधित व्यक्तीच्या पगारातून वसूल करण्यात येईल. तसेच शासन परिपत्रक क्रं : टीआरएन-२०१४/३४२/प्र.क्र.५०/१४/१२-अ, दि.२७ मे २०१४ नुसार यापुढे दरवर्षी वेतनवाढ देताना कर्मचारी यांनी नेमून दिलेले प्रशिक्षण पूर्ण केले किंवा कसे याची पडताळणी होणार आहे.

संदर्भ १ शासन निर्णय दि.२३ सप्टेंबर २०११ मधील परिच्छेद ६ नुसार प्रशिक्षणासाठी नामनिर्देशन होवूनही संबंधित कर्मचारी अपवादात्मक परिस्थिती वगळता गैरहजर राहिल्यास तसेच सुट मिळण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मान्यता न घेतल्यास त्यांच्या विरुध्द म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात यावी,तसेच प्रशिक्षणार्थी अनुपस्थित राहिल्यास किंवा प्रशिक्षणा दरम्यान शिस्तभंगाची कार्यवाहीस्तव कार्यमूक्त करण्यात आल्यास प्रतिदिन रु.१५००/-प्रमाणे पूर्ण सत्राचे एकुण ७५००/- रु त्या व्यक्तीच्या पगारातून कपात करुन संबंधित प्रशिक्षणसंस्थेच्या खात्यावर वसुली म्हणून वरीष्टाल्दारे जमा करावी व या वसुलीची नोंद त्या व्यक्तीच्या सेवापुस्तिकेत घेण्यात यावी,असे निर्देश आहेत. ही बाब विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी संबंधितांना निदर्शनास आणून द्यावी.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख यांनी संबधितांना निदर्शनास आणून द्याव्यात व प्रशिक्षणास कार्यमुक्त करण्यात यावे. सदरील कर्मचारी यांना प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित केलेल्या पत्राची प्रत या कार्यालयाच्या prabhodini31paithan@gmail.com या मेल आयडीवर तात्काळ प्रशिक्षण कार्यक्रम सुरु होण्यापुर्वी किमान ७ दिवस पुर्वी पाठविण्यात यावी जेणेकरुन संबधित कर्मचारी यांच्या प्रशिक्षणासाठीचे नामनिर्देशन स्विकृती पत्र निर्गमित करणे या कार्यालयास शक्य होईल, हि विनंती.

for सह संचालक
मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाथनगर(उत्तर) पैठण,जि.औरंगाबाद करिता

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१९/2475
दिनांक:- 2 AUG 2019

**महत्वाचे**

प्रति,
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड
पु.ला.शा.तं.लातूर,.म.तं.नि.लातूर

यांना कळविण्यात येते की, दि.२३.०९.२०११ च्या शासन निर्णय नुसार शासकीय सेवेतील गट-क संवर्गातील कर्मचा-यांकिरता सन २०१९-२० मध्ये नियोजित **उजळणी** प्रशिक्षणासाठी वरील पत्राचे अवलोकन करुन पत्रातील अटी व शर्ती पुर्तता होत असल्यास आपल्या संस्थेतील ज्या कर्मचा-यांचे अद्याप पर्यंत उजळणी प्रशिक्षण पुर्ण केले नाही अशा कर्मचा-यांची तात्काळ नावे या कार्यालयास कळविण्यात यावीत, जेणे करुन सदर कर्मचा-यांना उजळणी प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्त करणे सुलभ होईल.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत:- प्रोग्रामर यांना माहिती व या कार्यालयाच्या ई-मेलद्वारे सर्व शासकीय संस्थांना मेल करण्यासाठी